# कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, प्रतिबंध धोरण

**The Sexual Harassment of Women at Workplace**
**(Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013**
**("Sexual Harassment Act")**









कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ नुसार महिला सेवकांचे रक्षण करणे व त्यांना उचित न्याय देण्यासाठी व त्याबाबत कामकाजाचे नियंत्रण करणेसाठी व घेण्यात येणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी 'अंतर्गत तक्रार समिती' ची स्थापना बँक स्तरावर करण्यात आली असून त्याची नियमावली खालीलप्रमाणे –

## अ) प्रस्तावना -

बँकेमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित व अनुकूल वातावरण तयार करणे, त्यांना लैंगिक छळाला सामोरे जावे लागू नये याची खात्री देणे, यासाठी बँक वचनबध्द आहे. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या म्हणजेच चुकीचे हातवारे करणे, विचित्र अंगविक्षेप करणे, अश्लील वर्तन करणे, अप्रत्यक्षरित्या सोशल मिडीया (व्हॉट्सअॅप, फेसबुक) द्वारे लैंगिक छळाला कारणीभूत ठरतील असे वर्तन करणे या सर्व बाबींना प्रतिबंध करण्यासाठी व पिडीतेला न्याय देण्यासाठी अंतर्गत तक्रार समिती काम करेल.

दि. २३ एप्रिल २०१३ पासून कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 (Sexual Harassment Act) हा कायदा लागू झाला आहे.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासंबंधी महिला कर्मचाऱ्यांनी केलेल्या तक्रारींची चौकशी करून कारवाई करण्यासाठी कायद्यात द्विस्तरीय यंत्रणा निर्माण करण्याची तरतूद आहे. यामध्ये जिल्हा किंवा तालुका पातळीवर सरकारतर्फे स्थापन केली जाणारी 'स्थानिक तक्रार समिती' (Local Complaints Committee) आणि प्रत्येक कामाच्या ठिकाणी आस्थापनेने स्थापन करायची 'अंतर्गत तक्रार समिती'(Internal Complaints Committee) अशी रचना आहे. त्यानुसार आपल्या बँकेमध्ये कराड, सातारा, पुणे व सांगली जिल्ह्यातील शाखांकरिता शाखांचे गट निश्चित करुन शाखा गटनिहाय 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' ची स्थापना केली आहे.

आस्थापनेतील कोणत्याही ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध आहे आणि लैंगिक छळाच्या मनाईचे कोणतेही उल्लंघन केल्यास उल्लंघन करणाऱ्या विरूध्द उचित कारवाई केली जाईल, यासाठी आस्थापना कटिबद्ध आहे.

### आ) ***रचना*** -

१) सदस्य- समितीत किमान चार सदस्य असतील.

२) अस्थापनात कार्यरत असणारी वरिष्ठ पदावरील महिला सेवक सदर समितीची पिठासीन अधिकारी असेल.

३) महिलांच्या हितासाठी समर्पित असलेल्या किंवा सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या किंवा कायदेशीर ज्ञान असलेल्या सेवकांमधून दोन सदस्य असतील.

४) महिला कल्याण व समाज सेवेत कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्था अथवा संघटनामधून एक सदस्य असेल.

अशा पध्दतीने समितीची रचना असेल व समितीतील एकूण सदस्यांपैकी किमान ५०% सदस्य महिला असतील.

### इ ) ***समितीचा कार्यकाल*** -

समितीचा कार्यकाल हा ३ वर्षाचा असेल.

### ई) ***तक्रारी बाबत कार्यवाही*** -

१) पीडित महिलेला लैंगिक शोषणाबद्दल घटना घडल्यापासून १ वर्षाचे आत समितीकडे लेखी तक्रार करता येईल. तसेच पिडीत महिलेस लैंगिक शोषणाबाबतची घटना ही एकापाठोपाठ एक घडलेली असेल, तर सदर पिडीत महिलेने शेवटी घडलेल्या घटनेपासून १ वर्षाच्या आत समितीकडे तक्रार करणे आवश्यक आहे.

२) तक्रारी संदर्भात संबंधीत पीडित महिला कर्मचारी हीस आवश्यक सहकार्य देण्याची जबाबदारी सदर अंतर्गत समितीवर सोपवली आहे. पीडित महिला तिच्या शारिरीक व मानसिक अक्षमतेमुळे अथवा मृत्यूमुळे तक्रार दाखल करू शकत नसेल, त्याप्रसंगी तिचे कायदेशीर वारस, नातेवाईक, मित्र, सहकारी,

राष्ट्रीय महिला आयोग किंवा राज्य महिला आयोगाचे अधिकारी अथवा घटनेची माहिती असलेली कोणतीही व्यक्ती सदरची तक्रार दाखल करू शकते.

३) वरील समितीकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर समितीची तातडीने बैठक बोलावली जाईल.

४) तसेच कलम ११ मधील तरतुदीनुसार आस्थापनेच्या सेवा नियमानुसार समिती चौकशी करेल.

५) चौकशी दरम्यान तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे समितीस आढळून आल्यास ७ दिवसाचे आत समिती सदर तक्रार भारतीय दंड संहिता कलम ५०९/ भारतीय न्याय संहिता कलम ७९ अथवा इतर लागू तरतुदीनुसार पोलिस कार्यालयात नोंदविणेकरिता पाठवेल. तसेच पीडित महिला कर्मचाऱ्यास झालेला त्रास, मानसिक धक्का, वैद्यकीय उपचार व देखभाल खर्च, आर्थिक नुकसान व भविष्यातील कामाच्या संधीबाबत झालेल्या नुकसानाची भरपाई आरोपीत व्यक्तींकडून दंड वसूल करू शकेल.

६) पिडीत महिला व आरोपीत कर्मचारी हे आस्थापनेतीलच सेवक असल्यास, दोघांनाही न्यायास अनुसरुन मत मांडण्याची संधी समितीने देऊन, त्यावरील नोंदविण्यात आलेला निष्कर्ष दोन्ही पक्षांना उपलब्ध करून त्यांना सदर निष्कर्षाविरुद्धचे पुढील प्रतिनिधीत्व समितीपुढे सादर करता येईल.

७) चौकशी प्रक्रियेदरम्यान पीडित महिलेच्या विनंतीवरून समितीने बँक व्यवस्थापनास शिफारस केल्यास–

- पीडित महिला सेवक अथवा आरोपीत व्यक्तीची बदली दुसऱ्या ठिकाणी करतील.
- पीडित महिलेस तीन महिने कालावधीपर्यंत (मूळ रजेशिवाय) अतिरिक्त रजा मंजूर करतील.
- या व्यतिरिक्त इतर अनुषांगिक सहकार्याबाबत समिती निर्णय घेईल.

## उ) ***कामकाज गोपनियता*** -

पीडित व्यक्तीने विनंती केल्यास पीडित व्यक्तींच्या तक्रारी व चौकशी कामकाजाबाबत आवश्यक गोपनीयता बाळगली जाईल.

## ऊ) ***खोटी तक्रार व साक्ष*** -

पीडित महिलेने दिलेली तक्रार, चौकशीकामी दिलेली साक्ष अथवा सादर केलेले दस्तऐवज खोटे, बनावट असल्याचे निष्पन्न झाल्यास तक्रारदार व संबंधितांविरूध्द कायदेशीर कारवाई करणेची तरतूद प्रस्तुत कायद्यात आहे.

**ए) *बँकेची कर्तव्ये* -**

पीडित व्यक्तीस न्याय मिळवून देणेकामी व चौकशी प्रक्रियेच्या निःपक्ष सुनावणी कामी आवश्यक सहकार्य तसेच दोषी व्यक्तीविरूध्द कारवाई करणेकामी आवश्यक सहकार्य करेल.

**ऐ) *कामकाज नियमावली* -**

१) समितीचा कारभार, उद्देश, अंतर्गत तक्रार दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ दिवाणी न्यायालयासारखाच आहे. म्हणून बोलावलेला व्यक्ती हजर राहणे आणि त्याची चौकशी करणे, आवश्यक कागदपत्रे सादर करणे इ. बाबी निःपक्षपाती व कायद्यातील मुलभूत नैसर्गीक न्यायतत्वे यांचेशी सुसंगत असेल.

२) चौकशी समितीस दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. यामुळे समिती तक्रारी नोंदवून आरोपीत व्यक्तीस नोटीस काढणे, त्यांचेकडून खुलासा मागवणे, साक्षी नोंदवणे, कागदपत्रे तपासणे इ. द्वारे तक्रारीत तथ्य आहे किंवा नाही याबाबत निर्णय घेणे व त्याआधारे दोषी विरूध्द कारवाई बाबत शिफारस करणे.

३) समिती अध्यक्षांचे स्वाक्षरीने आवश्यकतेनुसार समितीची सभा बोलावली जाईल. सदर सभेचे ठिकाण मुख्य व विभागीय कार्यालय असेल. सदर ठिकाणी पीडीत महिलेस उपस्थित राहणे गैरसोईचे असल्यास पीडीत महिला व समिती यांच्या सोईनुसार सभेचे ठिकाण हे बँकेची कोणतीही शाखा/मुख्य कार्यालय हे ठरविले जाईल.

४) प्राप्त तक्रारीबाबत प्रत्यक्ष कामकाजादरम्यान चौकशी, सुनावणी, शपथेवर सरतपास, अंतिम निकालपत्र तयार करणे इ. कामकाज अध्यक्ष व किमान २ सदस्यांच्या उपस्थितीत करणे अनिवार्य असेल.

५) चौकशीचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर समिती निष्कर्ष व शिफारसीबाबतचा लेखी अहवाल बँकेस दहा दिवसात सादर करतील.

६) तक्रार प्राप्त झालेपासून चौकशीचे काम ९० दिवसात संपविणे आवश्यक असेल.

७) प्राप्त तक्रारीच्या अंतिम शिफारसींवर अध्यक्ष व सर्व सदस्यांची स्वाक्षरी असणे अनिवार्य असेल.

८) समिती स्थापनेनंतर एक वर्षाचा कालावधी पूर्ण झालेनंतर व तेथूनपुढे प्रत्येक वर्षी सदर समितीने केलेल्या कामकाजाचा अहवाल आस्थापनास व मुख्य कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जिल्हा स्तरीय अधिकारी यांना सादर करणे अनिवार्य राहिल.

९) सदर समितीस प्राप्त तक्रारीचे कामकाज सुरू असताना आवश्यकतेनुसार योग्य त्या प्रकारे अंतरिम आदेश पारीत करण्याचे अधिकार राहतील.

१०) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३ मधील तरतुदीस अनुसरुन संपूर्ण कामकाज अंतर्गत समितीने पार पाडण्याचे आहे.







**************************************************